महाराष्ट्रातील आयटीआय होणार सर्वोत्तम स्किल डेव्हलमपेंट हब -मंत्री मंगल प्रभात लोढा >>पान 2

पंतप्रधान मोदींचा एआय कंपन्यांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसोबत संवाद >>पान 3

जिल्ह्यातील किन्होळा, गणेशपुर आणि जानेफळ प्राथमिक आरोग्य केंद्राला 'राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकन' पुरस्कार >>पान 4


**सुविचार**


शिक्षणाचे तीन पैलू असतात- योग, उपयोग व सहयोग.- अज्ञात


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 171 ■ शनिवार, दि. 31 जानेवारी 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

दीर्घ विश्रांतीनंतर 'ईथा'च्या सेटवर दमदार कमबॅक, साकारतेय विठाबाई नारायणगावकर!

आतील पान

# सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्री पद मिळणार?

## दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाबाबत पवार कुटुंब घेणार निर्णय

**मुंबई/प्रतिनिधी :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पार्थिवावर अंतिमसंस्कार होऊन एक दिवसही उलटला नाही, तोवर राष्ट्रवादी काँग्रेसमधील नेत्यांनी त्यांच्या जागी पक्षाचे नवे उपमुख्यमंत्री नियुक्ती करण्याकरिता हालचाली सुरू केल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ, सुनील तटकरे आणि धनंजय मुंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'वर्षा' निवासस्थानी आज भेट घेऊन जवळपास तासभर चर्चा केली. या भेटीत त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या पुढचा नेता कोण? त्याचबरोबर पक्षाची वाटचाल कशी असेल? याबाबत चर्चा केल्याची समजते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर झालेल्या बैठकीनंतर बोलताना राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय



नेते प्रफुल्ल पटेल म्हणाले, ''सुनेत्रा वहिनींबाबत अद्याप निर्णय झालेला नाही. पण, आम्हाला ती जागा भरायची आहे. राष्ट्रवादीबाबत काय निर्णय घ्यायचा, याबाबतची आम्ही चर्चा करतोय. आज तिसरा दिवस आहे. कुटुंबाशी आम्ही चर्चा करून पुढचा निर्णय घेऊ.'' पण दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाबाबत प्रफुल्ल पटेल यांनी भाष्य करणं टाळलं.

अजित पवार यांच्या निधनामुळे निर्माण झालेल्या नेतृत्वाच्या पोकळीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या संभाव्य विलीनीकरणाबाबत निर्णय घेण्यासाठी पवार कुटुंबाची बारामतीत बैठक होणार असल्याची माहिती आहे. शरद पवार आणि अजित पवार यांच्या निकटवर्तीयांमध्ये उपमुख्यमंत्रीपद पवार कुटुंबातच राहावे, अशी भावना आहे. त्यासाठी सुनेत्रा पवार या योग्य उमेदवार असल्याचं मत व्यक्त केलं जात आहे. राष्ट्रवादीचे अध्यक्ष अजित पवार यांच्या जागी सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्री पद देण्याची मागणी सगळीकडून होत असल्यानं याबाबत पुढे काय पावलं उचलली जाणार याकडे सर्वांचं लक्ष लागले आहे.

पद्मसिंह पाटील यांच्या कन्या आहेत सुनेत्रा पवार- सुनेत्रा पवार सध्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या राज्यसभेच्या खासदार आहेत. सुनेत्रा पवार यांच्यासाठी राजकारण नवं नाही. त्या महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेते, माजी मंत्री पद्मसिंह पाटील यांच्या कन्या आहेत. शरद पवार यांनी स्थापन केलेल्या विद्या प्रतिष्ठान या शिक्षणसंस्थेच्या त्या विश्वस्त मंडळावरही राहिल्या आहेत. तसेच २०१७ पासून त्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सिनेटच्या सदस्य आहेत.

''गेल्या काही दिवसांत आमच्या एकत्रित अनेक बैठका झाल्या. राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र यावेत, अशी सर्वांचीच इच्छा होती. अजित दादांच्या मनातही दोन्ही राष्ट्रवादी एकत्र याव्यात हेच होते. १६ तारखेला माझ्या घरी बैठक झाली होती. त्यानंतर १७ तारखेला शरद पवार यांच्यासोबत चर्चा झाली. त्याचदरम्यान जिल्हा परिषद निवडणुकांची घोषणा झाली. कार्यकर्त्यांची इच्छा होती की, दोन्ही पक्षांनी या निवडणुका एकत्र लढवाव्यात. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकत्र लढवायच्या आणि त्यानंतर पुढील दिशा ठरवायची, असा निर्णय झाला. आता पुढे काय करायचे, याचा निर्णय पवार कुटुंबच घेईल,'' असे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जयंत पाटील यांनी बोलताना सांगितलं.

### महात्मा गांधी यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन मंत्रालयाशेजारील उद्यानात सर्वधर्मीय प्रार्थना

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त मंत्रालयाशेजारील उद्यानात महात्मा गांधींच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजलीही वाहण्यात आली.

यावेळी आमदार अमीन पटेल, नगरसेवक ज्ञानराज नाईक, नगरसेविका राजेश्वरी पाटणकर, महात्मा गांधी स्मारक समितीचे महासचिव देवरा सिंग, सचिव सुमन पवार, प्रा. अमर सिंग यांच्यासह कुलाबा म्युनिसिपल सेकंडरी स्कूलचे विद्यार्थी, नागरिक उपस्थित होते.

यावेळी सर्वधर्मीय प्रार्थना झाली. मर्झबान वाडिया यांनी पारसी, ज्युलिस क्रेझर यांनी ख्रिश्चन, मौलाना मझरूल इस्लाम यांनी मुस्लिम, दीपक क्षीरसागर यांनी बौद्ध, सोहन सिंग यांनी शिख, केशव चंद्र प्रभू यांनी हिंदू तर भरत जैन यांनी जैन धर्माच्या प्रार्थनेचे वाचन केले.

### परराज्यातील अवैध मद्य वाहतूकप्रकरणी कारवाई; १ कोटी ७२ लाखाचा मुद्देमाल जप्त

**मुंबई/प्रतिनिधी :** ठाणे जिल्ह्यातील मुंबई–नाशिक महामार्ग, सोनाळे गावच्या हद्दीत एच.पी पेट्रोल पंपाजवळ (ता. भिवंडी) परराज्यातील मद्याची वाहतूक करणाऱ्या वाहनावर २७ जानेवारी रोजी कारवाई करण्यात आली. या कारवाईत गोवा राज्यात निर्मित महाराष्ट्र राज्यात विक्रीस बंदी असलेल्या रॉयल ब्ल्यु माल्ट व्हिस्की ब्रॅण्ड मद्याचे १४०० बॉक्स अर्थात १८० मि.ली क्षमतेच्या ६७ हजार २०० बाटल्या दारूबंदी कायद्यातंर्गत जप्त करण्यात आल्या. तसेच आयशर कंपनीच्या एमएच ०४ एलवाय ४१३३ क्रमांक असलेल्या सहाचाकी वाहनासह, एक मोबाईल फोन असा एकूण १ कोटी ७२ लाख ९४ हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या कारवाईत श्रवणकुमार कृष्णराम पंवार, रा. सगडवा, पो. डावल, ता. चीतलवाना, जि. जालोर (राजस्थान) यास अटक करण्यात आली आहे. राज्य उत्पादन शुल्कचे आयुक्त डॉ राजेश देशमुख, सहआयुक्त प्रसाद सुर्वे, कोकण विभागाचे विभागीय उपआयुक्त प्रदीप पवार, ठाणे यांच्या कारवाईच्या दिलेल्या निर्देशानुसार व दुय्यम निरीक्षक दिगंबर शेवाळे यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करण्यात आली. कारवाईमध्ये दुय्यम निरीक्षक रिंकेश दांगट, दुय्यम निरीक्षक व्ही. व्ही. सकपाळ, दुय्यम निरीक्षक एच. बी यादव, सहायक दुय्यम निरीक्षक महावीर कोळेकर, तसेच जवान हुनमंत गाढवे, हर्षल खरबस, अमीत सानप, श्रीराम राठोड, कुणाल तडवी, सागर चौधरी यांचा सहभाग होता.

या गुन्ह्याचा पुढील तपास दुय्यम निरीक्षक रिंकेश दांगट करीत आहे, असे विभागीय भरारी पथकाचे दुय्यम निरीक्षक यांनी कळविले आहे.

## बारामती विमान अपघात

### अजित पवारांसह पाच जणांच्या मृत्यूचा तपास सीआयडी करणार

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** बारामती विमानतळावर बुधवारी सकाळी घडलेल्या भीषण विमान अपघातात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह पाच जणांचा मृत्यू झाला. धावपट्टीच्या शेवटापासून अवघ्या २०० मीटर अंतरावर चार्टर्ड विमान कोसळले. या प्रकरणी बारामती तालुका पोलीस ठाण्यात अपघाती मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पुढील तपास महाराष्ट्र गुन्हे अन्वेषण विभागाकडे सोपवण्यात येणार आहे. या अपघातात कॅप्टन सुमित कपूर, सहवैमानिक कॅप्टन शांभवी पाठक, वैयक्तिक सुरक्षा अधिकारी विदिप जाधव आणि विमान परिचारिका पिंकी माळी यांचा मृत्यू झालाय. घटनेनंतर सायंकाळी विमान अपघात तपास ब्युरो एएआयबी यांचे विशेष पथक घटनास्थळी दाखल होऊन फॉरेन्सिक तपासास सुरुवात करण्यात आलीय.



तपास सीआयडी कडे वर्ग केला जाणार : पुणे ग्रामीण पोलिसांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, ''बारामती तालुका पोलीस ठाण्यात अपघाती मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. नियमानुसार हा तपास सीआयडी कडे वर्ग केला जाणार आहे. नागरी विमान वाहतूक मंत्रालयाच्या अखत्यारीतील विमान अपघाताच्या तापसाची सुत्रे ब्युरोने हाती घेतली आहेत. एएआयबी च्या प्राथमिक आणि तांत्रिक निष्कर्षांच्या आधारे पुढील चौकशी होणार आहे.''

एअर ट्रॅफिक कंट्रोलला अपेक्षित 'रीड-बॅक' देण्यात आला नाही : बुधवारी सकाळी अजित पवार मुंबईहून बारामतीकडे रवाना झाले होते. ५ फेब्रुवारीला होणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्यात चार प्रचारसभांना संबोधित करण्याचा त्यांचा कार्यक्रम होता. राज्य सरकारने अपघातापूर्वीच्या घटनाक्रमाबाबत अधिकृत निवेदन जारी केलंय.

निवेदनानुसार, 'लिअरजेट' प्रकारच्या विमानाला खराब दृश्यमानतेमुळे एकदा 'गो-अराऊंड' करून नंतर बारामती विमानतळावर उतरण्याची परवानगी देण्यात आली होती. मात्र उतरण्याची परवानगी मिळाल्यानंतर विमानाकडून एअर ट्रॅफिक कंट्रोलला अपेक्षित 'रीड-बॅक' देण्यात आला नाही. त्यानंतर काही क्षणांतच धावपट्टीच्या कडेला विमानाने पेट घेतला आणि अपघात घडला.

मृतांचे मृतदेह बाहेर काढून रुग्णालयात पाठवले : अधिकाऱ्यांनी सांगितले की, एनडीआरएफ आणि अन्य आपत्कालीन बचाव पथके घटनास्थळी पोहोचेपर्यंत स्थानिक नागरिकांनी मृतांचे मृतदेह बाहेर काढून रुग्णालयात पाठवले होते. त्यानंतर प्रादेशिक न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळेचे पथक घटनास्थळी दाखल होऊन अपघातस्थळ सुरक्षित करण्यात आले.

### गृहविभागाच्या अपर मुख्य सचिव पदी मनिषा पाटणकर-म्हैसकर यांची नियुक्ती

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याच्या गृहविभागात महत्त्वाचा प्रशासकीय बदल करण्यात आला असून सनदी अधिकारी मनिषा पाटणकर-म्हैसकर यांची गृहविभागाच्या अपर मुख्य सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे. विद्यमान अपर मुख्य सचिव इक्बाल सिंह चहल यांच्या सेवानिवृत्तीमुळे हे पद रिक्त आहे.

इक्बाल सिंह चहल यांच्या निवृत्तीनंतर गृहविभागाच्या अपर मुख्य सचिवपदाचा कार्यभार मनिषा पाटणकर-म्हैसकर या स्वीकारणार आहेत. सध्या त्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिवपदावर कार्यरत असून, त्यांच्या जागी मिलिंद म्हैसकर यांची नियुक्ती करण्यात आली आहेत.

सामान्य प्रशासन विभागाने जारी केलेल्या आदेशानुसार, मनिषा पाटणकर-म्हैसकर यांनी आपला सध्याचा कार्यभार मिलिंद म्हैसकर यांच्याकडे सोपवून ३१ जानेवारी रोजी गृहविभागाच्या अपर मुख्य सचिवपदाचा कार्यभार स्वीकारावा, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

## पीटी उषा यांच्या पतीचे निधन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** भारताची माजी धावपटू व भारताच्या ऑलिम्पिक असोसिएशनच्या अध्यक्षा पीटी उषा यांच्या पतीचं निधन झालं आहे. पीटी उषा यांचे पती व्ही. श्रीनिवासन यांचं वयाच्या ६७ व्या वर्षी आकस्मिक निधन झाल्याची माहिती समोर आली आहे. कुटुंबातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, व्ही. श्रीनिवासन यांनी आज ३० जानेवारी रोजी सकाळी अखेरचा श्वास घेतला. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पीटी उषा यांचं फोन करत सांत्वन केलं.शुक्रवारी सकाळी श्रीनिवासन त्यांच्या राहत्या घरी बेशुद्ध होऊन कोसळले आणि त्यानंतर त्यांना लगेचच जवळच्या रुग्णालयात नेण्यात आलं, परंतु डॉक्टर मात्र त्यांना वाचवू शकले नाहीत आणि त्यांची प्राणज्योत मालवली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पीटी उषा यांच्याशी



फोनवरून संवाद साधला आणि शोक व्यक्त केला.माजी केंद्रीय सरकारी कर्मचारी असलेले श्रीनिवासन हे पीटी उषा यांच्या त्यांच्या गौरवशाली क्रीडा कारकिर्दीत सतत त्यांच्यासोबत होते. त्यांना त्यांचा आधार आणि त्यांच्या अनेक व्यावसायिक कामगिरीमागील शक्ती म्हणून ओळखलं जात असे. पीटी उषा यांनी १९९१ मध्ये श्रीनिवासन यांच्याशी लग्न केलं. या दोघांनाही विघ्नेश उज्ज्वल नावाचा मुलगा आहे. श्रीनिवासन हे केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलातून पोलिस उपअधीक्षक म्हणून निवृत्त झाले.व्ही. श्रीनिवासन हे फ्लाइंग फेरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारतीय धावपटू पी.टी. उषा यांचे पती होते. श्रीनिवासन हे नुकतेच केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल (सीआयएसएफ) मधील पोलिस उपअधीक्षक पदावरून निवृत्त झाले होते. पीटी उषा यांनी स्वत: अनेक वेळा सांगितलं आहे की त्यांचे पती त्यांच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनातील सर्वात मजबूत आधारस्तंभ आहेत.

श्रीनिवासन यांनी पीटी उषा यांना तिच्या संपूर्ण क्रीडा कारकिर्दीत पाठिंबा दिला आणि उषा स्कूल ऑफ अ‍ॅथलेटिक्सची स्थापना केली. शिवाय, राज्यसभा सदस्य असताना ते नेहमीच त्यांच्या पाठीशी होते. साधे आणि सहज स्वभावाचे असलेले श्रीनिवासन हे कायम पडद्यामागे राहत होते. तरीही त्यांनी खेळांना प्रोत्साहन देण्यात खूप रस घेतला असे म्हटलं जातं.




## सरकारी विमानांच्या देखभालीचा 'प्लॅन' तयार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र सरकारने राज्यातील सरकारी विमानांच्या आणि हेलिकॉप्टर्सच्या तातडीच्या कामांसाठी मोठा निधी उपलब्ध करून दिला आहे. सरकारी हवाई वाहनांची देखभाल आणि दुरुस्ती वेळेत व्हावी, या उद्देशाने ६ कोटी रुपयांच्या खर्चाला वित्त विभागाने हिरवा कंदिल दाखवला आहे. डिसेंबर २०२५ मध्ये मांडण्यात आलेल्या पुरवणी मागण्यांमध्ये या निधीची तरतूद करण्यात आली होती. यामध्ये प्रत्येकी ३ कोटींच्या दोन स्वतंत्र मागण्यांचा समावेश होता. वित्त विभागाच्या व्यय अग्रक्रम समितीने या प्रस्तावाचा सकारात्मक विचार करून 'लहान बांधकामे' आणि 'यंत्रसामुग्री व साधनसामुग्री' या तांत्रिक गरजांसाठी हा निधी मंजूर केला आहे. यामुळे आता सरकारी हवाई ताफ्यातील वाहनांच्या अत्यावश्यक कामांना वेग मिळणार आहे.

नेमका प्रस्ताव काय ?

राज्य शासनाच्या ताफ्यातील विमानांच्या आणि हेलिकॉप्टर्सच्या तातडीच्या देखभालीसाठी मंजूर करण्यात आलेला ६ कोटी रुपयांचा निधी आता प्रत्यक्ष वितरीत केला जाणार आहे. डिसेंबर २०२५ च्या हिवाळी अधिवेशनात मंजूर झालेल्या या प्रस्तावावर वित्त विभागाने अंतिम शिक्कामोर्तब केले असून, हा निधी 'बीम्स' प्रणालीवर उपलब्ध करून देण्यास सहमती दर्शविली आहे. शासकीय हवाई वाहनांच्या सुरक्षेच्या आणि तांत्रिक कामांच्या दृष्टीने हा प्रस्ताव अत्यंत महत्त्वाचा होता. यामध्ये प्रामुख्याने दोन तांत्रिक विभागांसाठी निधीची विभागणी करण्यात आली आहे. १. लहान बांधकामे: हवाई वाहनांशी संबंधित किरकोळ बांधकामे व दुरुस्तीसाठी ३ कोटी रुपये. २. यंत्रसामुग्री व साधनसामुग्री: विमानांचे सुटे भाग आणि अत्यावश्यक यंत्रणेसाठी ३ कोटी रुपये. लेखाशीर्ष क्रमांक २०७० ०१५६ अंतर्गत हा खर्च 'अनिवार्य'



श्रेणीत ठेवण्यात आला होता. व्यय अग्रक्रम समितीने या खर्चाला आधीच मान्यता दिली होती, त्यानंतर हिवाळी अधिवेशनात विधीमंडळानेही यावर मोहोर उमटवली. आता वित्त विभागाने हा निधी प्रणालीवर वितरीत करण्यास परवानगी दिल्याने, प्रलंबित कामे तातडीने पूर्ण होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

राज्य सरकारने सरकारी विमानं आणि हेलिकॉप्टर्सच्या तातडीच्या दुरुस्तीसाठी केवळ निधीच मंजूर केला नाही, तर त्याच्या वापराबाबत कडक नियमावलीही जाहीर केली आहे. २१ जानेवारी २०२६ रोजी वित्त विभागाने दिलेल्या सहमतीनंतर, आता हा ६ कोटींचा निधी प्रत्यक्ष खर्चासाठी उपलब्ध करून देण्यात आला असून, त्याबाबतचा अधिकृत शासन निर्णय (उठ) निर्गमित करण्यात आला आहे.

शासनाने नेमके कोणते निर्णय घेतले?

१. निधीचे वितरण आणि वापर :

डिसेंबर २०२५ च्या हिवाळी अधिवेशनात मंजूर झालेला ६ कोटींचा निधी आता 'बीम्स' प्रणालीवर वितरीत झाला आहे. यातील ३ कोटी रुपये 'लहान बांधकामे' आणि उर्वरित ३ कोटी रुपये 'यंत्रसामुग्री व साधनसामुग्री' या कामांसाठीच वापरणे बंधनकारक आहे. हा निधी २०२५-२६ या आर्थिक वर्षातच खर्च करावा लागणार आहे.

२. अधिकारी नियुक्त :

या निधीच्या विनियोगासाठी मुंबईच्या विमानचालन संचालनालयाच्या उपसंचालकांना 'आहरण व संवितरण अधिकारी' म्हणून, तर संचालकांना 'नियंत्रक अधिकारी' म्हणून घोषित करण्यात आले आहे. सदर पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध करुन दिलेला निधी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आला आहे त्याच प्रयोजनासाठी खर्ची पडेल याची दक्षता उपसंचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई यांनी घ्यावी. निधीचा गैरवापर टाळण्यासाठी ही जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे.

३. पारदर्शकता आणि हिशोब :

खर्चाचा पूर्ण तपशील आणि 'उपयोगिता प्रमाणपत्र' विहित मुदतीत महालेखापाल कार्यालयाला सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच खर्चाचा ताळमेळ महालेखापालांच्या लेख्यांशी जुळवण्याची जबाबदारी विमानचालन संचालकांवर सोपवण्यात आली आहे.

४. डिजिटल नोंदणी :

हा शासन निर्णय पारदर्शकतेसाठी महाराष्ट्र सरकारच्या अधिकृत संकेतस्थळावर (संकेतांक: २०२६०१२९१७५३१३५७०७) उपलब्ध करून देण्यात आला असून तो डिजिटल स्वाक्षरीने प्रमाणित आहे.

## अर्थव्यवस्थेने गती पकडली...

सलग चौथ्या वर्षी भारत ही जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था ठरली. भारतीय अर्थव्यवस्था पुढील आर्थिक वर्षातही वाढीची हीच गती कायम राखेल, असा अंदाज आर्थिक सर्वेक्षणात व्यक्त करण्यात आला. तसेच उत्पादन, गुंतवणूक, रोजगार, पायाभूत सोयीसुविधा आणि अन्य क्षेत्रांबद्दलही आर्थिक पाहणी अहवालातील ही सकारात्मकता भारताच्या वेगवान वाढीवर शिक्कामोर्तब करणारी अशीच! भारताची अर्थव्यवस्था पुढील आर्थिक वर्षातही ठोस गती राखण्याची अपेक्षा आर्थिक पाहणी अहवालातून काल वर्तविण्यात आली. २०२५-२६च्या आर्थिक सर्वेक्षणानुसार, आर्थिक वर्ष २०२७ मध्ये वास्तविक 'जीडीपी' विकासदर ६.८ टक्के ते ७.२ टक्क्यांदरम्यान राहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. आर्थिक वर्ष २०२६ मध्ये ७.४ टक्के वाढ नोंदवल्यानंतर भारत सलग चौथ्या वर्षी जगातील सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था ठरली. या सर्वेक्षणानुसार, भारताच्या मध्यम-मुदतीच्या संभाव्य विकासदरात सुधारणा झाल्याचे दिसून आले. मागील अंदाज ६.५ टक्के असताना आता तो सात टक्क्यांपर्यंत वाढला आहे. आर्थिक सर्वेक्षण हा सरकारचा औपचारिक अहवाल असला, तरी त्याचा खरा अर्थ हा आकड्यांच्या पलीकडील असतो. तो अर्थव्यवस्थेची दिशा दाखवतो, धोरणकर्त्यांची मानसिकता स्पष्ट करतो आणि पुढील धोरणांची पायाभरणी करणारा असतो. यंदाच्या आर्थिक सर्वेक्षणातून हे स्पष्ट होते की, भारतीय अर्थव्यवस्थेत पुरेपूर विश्वास आहे. जागतिक पातळीवर अस्थिरतेचे वातावरण कायम असताना भारतीय अर्थव्यवस्था वाढीचा वेग टिकवून आहे, ही बाब सर्वेक्षण ठळकपणे मांडते. आंतरराष्ट्रीय बाजारपेठांतील तणाव, युद्धजन्य परिस्थिती, ऊर्जादरांतील चढउतार आणि व्यापार अडथळे असूनही देशांतर्गत मागणीने अर्थव्यवस्थेला आधार दिला. हा आधार तत्कालिक नाही, तर मागील दशकात उभ्या राहिलेल्या धोरणात्मक चौकटीचा परिणाम आहे. कृषी क्षेत्राबाबत सर्वेक्षणात स्थैर्याचा सूर आहे. पावसावर अवलंबून असलेली शेती हळूहळू तंत्रज्ञान, सिंचन आणि बाजारपेठेशी अधिक जोडली जात असल्याचे चित्र मांडले जाते. पीक-विविधता, साठवणूक सुविधा आणि शेतमालाच्या किमतींसाठी केलेले प्रयत्न, यामुळे कृषी क्षेत्र अर्थव्यवस्थेचा कमजोर दुवा राहिलेला नाही, असा दावा अहवाल करतो. मात्र, ही सुधारणा सर्वत्र समान नाही. काही भागांमध्ये प्रगती दिसते, तर काही ठिकाणी शेतकरी अजूनही असुरक्षिततेच्या चक्रात अडकलेला आहे. उत्पादन क्षेत्राबाबत आर्थिक सर्वेक्षण अधिक ठाम आहे. उत्पादन क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा वाढवण्याचा सरकारचा प्रयत्न सातत्याने सुरू असल्याचे अधोरेखित करण्यात आले आहे. पायाभूत सुविधा, सुलभ नियमावली, उद्योगांना मिळणारी प्रोत्साहने आणि देशांतर्गत बाजारपेठेचा आकार, यामुळे उत्पादन क्षेत्राला चालना मिळत असल्याचा दावा केला जातो. लघू आणि मध्यम उद्योगांवर दिलेला भर रोजगारनिर्मितीसाठी महत्त्वाचा ठरतो. तरीही, जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी गुणवत्ता, उत्पादकता आणि कौशल्य यावर अधिक लक्ष देणे गरजेचे असल्याची जाणीव या दाव्यांमागे दडलेली आहे. पायाभूत सोयीसुविधांवरील गुंतवणूक हा सर्वेक्षणाचा मध्यवत मुद्दा. रस्ते, रेल्वे, ऊर्जा, बंदरे आणि दळणवळण या क्षेत्रांतील भांडवली खर्च भविष्यातील वाढीचा पाया मानला जातो. या गुंतवणुकीमुळे अर्थव्यवस्थेला गती मिळते, रोजगारनिर्मिती होते आणि खासगी गुंतवणुकीला चालना मिळते. महागाई नियंत्रणाच्या बाबतीत सर्वेक्षण समाधान व्यक्त करते. महागाई आटोक्यात ठेवण्यासाठी पुरवठा व्यवस्थापन, आयात धोरणे आणि प्रशासकीय हस्तक्षेप यांचा वापर करण्यात आल्याचे नमूद केले आहे. तरीही, सामान्य नागरिकांच्या दृष्टीने जीवनावश्यक वस्तूंचा खर्च अजूनही ताण निर्माण करणारा आहे. दीर्घकालीन उपाय म्हणून उत्पादन क्षमता वाढवणे आणि पुरवठा साखळी मजबूत करणे अपरिहार्य असल्याचा अप्रत्यक्ष संदेश येथे आहे. आयात-निर्यातीच्या बाबतीत सर्वेक्षण सावध भूमिका घेते. जागतिक व्यापारातील अनिश्चितता आणि संरक्षणवादी धोरणांमुळे निर्यातीवर मर्यादा येऊ शकतात, हे स्पष्टपणे मान्य करण्यात आले आहे. आयातीच्या बाबतीत आत्मनिर्भरतेवर भर देण्यात आला आहे; विशेषतः ऊर्जा, संरक्षण आणि तंत्रज्ञान क्षेत्रांत. आत्मनिर्भरता म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापारापासून दूर जाणे नव्हे, तर जागतिक साखळीत स्वतःची भूमिका अधिक मजबूत करणे, असा अर्थ येथे सूचित केला आहे. गुंतवणुकीच्या चित्रात सकारात्मकता दिसते. देशांतर्गत गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास वाढतो आहे आणि परदेशी गुंतवणूकही तुलनेने स्थिर राहिली आहे. धोरणात्मक स्पष्टता, कर-व्यवस्थेतील सुधारणा आणि मोठी बाजारपेठ, यामुळे भारत गुंतवणुकीसाठी आकर्षक राहिला आहे. तरीही, जागतिक भांडवलाच्या चंचल स्वभावामुळे दीर्घकालीन संरचनात्मक सुधारणा आवश्यक असल्याची जाणीव या मांडणीतून होते. रोजगाराच्या बाबतीत सर्वेक्षण मिश्र चित्र मांडते. रोजगारनिर्मिती होत असल्याचे मान्य केले जाते. मात्र, रोजगाराच्या स्वरूपाबाबत प्रश्न उपस्थित केले जातात. असंघटित क्षेत्रातील रोजगार, स्वयंरोजगार आणि अल्प उत्पन्नाचे काम अजूनही मोठ्या प्रमाणात आहे. उच्च कौशल्याधारित रोजगारनिर्मिती ही अर्थव्यवस्थेची खरी गरज असल्याचा स्पष्ट संकेत येथे दिला आहे.

# महाराष्ट्रातील आयटीआय होणार सर्वोत्तम स्किल डेव्हलमपेंट हब -मंत्री मंगल प्रभात लोढा

- राज्यातील आयटीआयचे आधुनिकीकरण, पीएम सेतू योजना राबविणार
- पहिल्या टप्प्यात नागपूर, छत्रपती संभाजीनगर, पुणे यांचा समावेश
- केंद्र आणि राज्य सरकार मिळून २४२ कोटी खर्च करणार



**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या शाश्वत विकासाच्या दूरदृष्टीच्या संकल्पनेतून आकाराला आलेल्या पीएम सेतू या योजनेमुळे महाराष्ट्रातील आयटीआय सर्वोत्तम स्किल डेव्हलमपेंट हब होणार असल्याचे, राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी म्हटले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रातील चार जिल्ह्यात ही योजना सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे (आयटीआय) पीएम सेतू योजनेंतर्गत आधुनिकीकरण होणार असून पुढच्या टप्प्यात उर्वरित जिल्ह्यांचा समावेश करण्यात येणार आहे.

कुशल मनुष्यबळाची मागणी आणि पुरवठा यांच्यातील तफावत भरून काढण्यासाठी पीएम सेतू योजनेतून आयटीआयचे आधुनिकीकरण करण्याची योजना आहे. या योजनेच्या पहिल्या टप्पात नागपूर, छत्रपती संभाजी नगर आणि पुणे येथील आयटीआयचे आधुनिकीकरण केले जाणार आहे.

**केंद्र आणि राज्य सरकार मिळून २४२ कोटी खर्च**

आयटीआयच्या आधुनिकीकरणासाठी हब अँड स्पोक प्रारूप विकसित केले जाणार आहे. या योजनेत केंद्र आणि राज्य सरकार मिळून २४२ कोटी खर्च करणार असून यामुळे राज्यातील आयटीआयचे रूप पालटणार आहे. या आधुनिकीकरणामुळे तरुणांना विविध क्षेत्रात दर्जेदार व्यावसायिक संधी उपलब्ध होणार आहे. या योजनेची पुढच्या वर्षात टप्प्या-टप्प्याने अंमलबजावणी करण्यासही मान्यता देण्यात आली. योजनेकरिता केंद्र सरकारचा ५० टक्के, राज्य सरकारचा ३३ टक्के आणि उद्योग क्षेत्राचा १७ टक्के निधी असेल. आयटीआयच्या आधुनिकीकरणासाठी वरील प्रमाणे निधी खर्च करण्यास मान्यता देण्यात आली. राज्यात एका क्लस्टरकरिता (१ हब आयटीआय व ४ स्पोक आयटीआय) पाच वर्षाकरीता अंदाजित २४१ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. त्याकरिता केंद्र सरकारचे ११२ कोटी रुपये, राज्य शासनाचे ९८ कोटी रुपये आणि उद्योग क्षेत्राचा ३१ कोटी रुपयांचा वाटा असेल. त्यापैकी राज्य शासनाकडून पाच वर्षाकरिता करावयाच्या ९८ कोटी रुपयांच्या खर्चासही मान्यता देण्यात आली आहे.

**पहिल्या टप्प्यात नागपूर, छत्रपती संभाजीनगर, पुणे यांचा समावेश**

नागपूर येथील गव्हर्न्मेंट आयटीआय, नागपूर आयटीआयचे हब म्हणून आधुनिकीकरण केले जाईल. मुलींसाठीचे आयटीआय, नागपूर, कामटी, हिंगणा आणि बुटीबोरी येथील आयटीआयचा समावेश आहे. छत्रपती संभाजी नगर येथील आयटीआय हब म्हणून आधुनिकीकरण करणार. त्याचबरोबर पैठण, खुल्ताबाद, गंगापूर आणि फुलंब्री येथील आयटीआयचेही आधुनिकीकरण केले जाणार आहे. पुण्यातील औंध येथील आयटीआयचा हब म्हणून आधुनिकीकरण केले जाणार. औंध येथील मुलींसाठीचे आयटीआय, खेड-राजगुरूनगर आणि मुळशी येथील आयटीआयचे आधुनिकीकरण करण्यात येणार आहे.

**नवीन अभ्यासक्रमासह विद्यमान अभ्यासक्रमातही सुधारणा**

एका हब आयटीआयमध्ये सरासरी चार नवीन अभ्यासक्रम सुरू केले जाणार असून, दहा विद्यमान अभ्यासक्रमांची श्रेणी सुधारणा केली जाणार आहे. स्पोक आय़टीआयमध्ये दोन नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत तर आठ अभ्यासक्रमांची श्रेणी सुधारणा केली जाणार आहे. उद्योगांची संख्या कमी असलेल्या ठिकाणी सेवा क्षेत्र, बहुकौशल्य अभ्यासक्रम आणि उपजिविका अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत.

गुरुकुल परंपरा, नालंदासारखी विद्यापीठे आणि आर्यभट्टांसारखे विद्वान यांच्यामुळे भारत ज्ञानार्जनाचे जागतिक केंद्र म्हणून उदयास आले. आज त्या ज्ञानपरंपरेलाच अनुसरून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आधुनिक कौशल्य प्रशिक्षणाची जोड देत आयटीआयच्या माध्यमातून नवा भारत घडवण्याचा प्रयत्न करत असल्याचेही मंत्री लोढा यांनी स्पष्ट केले आहे.

## महाराष्ट्र शासनाचे चार वर्षे मुदतीचे १,५०० कोटी रुपयांचे रोखे विक्रीस

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासन चार वर्षे मुदतीचे १,५०० कोटींचे रोखे विक्रीस काढत आहे. राज्य शासनास ३५० कोटींपर्यंत अतिरिक्त रक्कम उभारण्याचा पर्याय उपलब्ध असेल. विक्री शासनाच्या विनिर्दिष्ट अधिसूचनेमध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून करण्यात येईल. तसेच राज्य शासनाच्या क्र. एलएनएफ. १०.१९/प्र.क्र.१०/अर्थोपाय, दिनांक १६ मे,२०१९ च्या सुधारित सर्वसाधारण अधिसूचनेमध्ये नमूद केलेल्या व वेळोवेळी सुधारित केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहील, अशी माहिती वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा) विकास चंद्र रस्तोगी यांनी पत्रकान्वये दिली आहे.

कर्जाद्वारे मिळालेल्या रक्कमेचा विनियोग महाराष्ट्र सरकारच्या विकास कार्यक्रमांना अर्थपुरवठा करण्यासाठी करण्यात येईल. भारतीय राज्य घटनेच्या अनुच्छेद २९३(३) अन्वये सदरील कर्ज उभारणीस केंद्र शासनाची अनुमती घेण्यात आली आहे.

शासकीय रोख्यांची विक्री भारतीय रिझर्व्ह बँक, फोर्ट, मुंबई द्वारे १६ मे, २०१९ च्या सुधारित सर्वसाधारण अधिसूचना क्र.एलएनएफ. १०.१९/प्र.क्र.१०/अर्थोपाय, परिच्छेद ६.१ मध्ये निदेर्शित केलेल्या कार्यप्रणालीनुसार लिलावाने करण्यात येईल.

अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) एकूण अधिसूचित केलेल्या शासन कर्जरोखे रकमेच्या १० टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र एका गुंतवणुकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीत जास्त १ टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंत वाटप करण्यात येईल. ३ फेब्रुवारी, २०२६ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल. तर लिलावाचे बीडस् ३ फेब्रुवारी, २०२६ रोजी संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, (ई-कुबेर) सिस्टीमनुसार सादर करावयाचे आहेत.

यामध्ये स्पर्धात्मक बिड्स संगणकीय प्रणालीद्वारे ई-कुबेर सिस्टीमनुसार सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत सादर करावेत. तर अस्पर्धात्मक बीडस् ई-कुबेर सिस्टिमनुसार सकाळी १०.३० ते ११.०० वाजेपर्यंत सादर करावेत. लिलावाचा निकाल भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिद्ध करण्यात येईल. यशस्वी झालेल्या बीडर्सकडून रकमेचे प्रदान ४ फेब्रुवारी, २०२६ रोजी करण्यात येईल. यशस्वी झालेल्या बीडर्सकडून रकमेचे प्रदान ०४ फेब्रुवारी, २०२६ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात रोखीने, बँकर्स धनादेश/प्रदान आदेश, डिमांड ड्राफ्ट किंवा त्यांच्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई येथील खात्यात देय असलेले धनादेश बँकेची कामकाजाची वेळ संपण्यापूर्वी अधिदानाने प्रदान करण्यात येतील.

कर्जरोख्याचा कालावधी चार वर्षांचा असून, रोख्यांचा कालावधी ४ फेब्रुवारी, २०२६ पासून सुरू होईल, तर कर्जरोख्याची परतफेड दिनांक ४ फेब्रुवारी, २०३० रोजी पूर्ण किमतीने केली जाईल. अधिकतम प्राप्तीचा दर हा लिलावात विक्री केलेल्या रोख्यांवरील दरसाल दर शेकडो कूपन दरा एवढा असेल व्याजाचे प्रदान प्रतिवर्षी ४ ऑगस्ट आणि ४ फेब्रुवारी रोजी सहामाही पद्धतीने करण्यात येईल.

शासकीय रोख्यांमधील बँकांची गुंतवणूक ही बँकिंग विनियम अधिनियम, १९४९ खालील कलम २४ अंतर्गत सांविधिक रोकड सुलभता गुणोत्तर (एसएलआर) या प्रयोजनार्थ पात्र समजण्यात येईल. हे कर्जरोखे पुनः विक्री-खरेदीसाठी अनुज्ञेय असतील, अशी माहिती वित्त विभागाने दिली आहे.

# 'कृत्रिम बुद्धिमत्ते'च्या माध्यमातून दिव्यांगांना सेवा देऊन आत्मनिर्भर करणार : मुख्य सचिव राजेश अग्रवाल

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** : दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) ही केवळ आधुनिक तांत्रिक संकल्पना न राहता, त्यांच्या दैनंदिन जीवनातील अडचणी दूर करणारे प्रभावी साधन ठरत आहे. दृष्टिदोष, श्रवणदोष, शारीरिक तसेच बौद्धिक अक्षम असलेल्या व्यक्तींसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित उपकरणे, ॲप्स आणि डिजिटल सेवा मोठ्या प्रमाणावर उपयुक्त ठरत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सहाय्यक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून दिव्यांग व्यक्तींना सुलभ सेवा निर्माण करून त्यांना आत्मनिर्भर करावे, असे प्रतिपादन मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी केले.

इंडिया एआय इम्पॅक्ट समिटच्या पार्श्वभूमीवर 'दिव्यांग व्यक्तींच्या समावेशन व सक्षमीकरणासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेची (एआय) क्षमता उलगडणे' या विषयावर प्री-समिट राऊंडटेबलचे आयोजन मुंबईतील हॉटेल इंटर कॉन्टिनेंटल येथे करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे उपस्थित होते. या कार्यक्रमाप्रसंगी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

मुख्य सचिव अग्रवाल म्हणाले, एआयच्या साहाय्याने तयार होणाऱ्या इलेक्ट्रिक व्हीलचेअर, कृत्रिम हात-पाय, संवाद सहाय्यक उपकरणे, आय-ट्रॅकिंग व हेड-माऊससारखी साधने दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबी जीवन जगण्यास मदत करत आहेत. बौद्धिक अक्षमत्वाच्या क्षेत्रात, विशेषतः ऑटिझमचे निदान करण्यासाठी एआय महत्त्वाची भूमिका बजावत आहे. शासकीय सेवांमध्ये एआयचा वापर करून दिव्यांगांसाठी प्रक्रिया अधिक सुलभ करण्यात येत आहे. बहुभाषिक चॅटबॉट आणि डिजिटल साहाय्य प्रणालींमुळे आवश्यक माहिती, थेरपी केंद्रे, विशेष शाळा तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ नागरिकांना एका क्लिकवर मिळत आहे. आता दिव्यांग केवळ स्वावलंबी होत नसून कुटुंबाचा पालन पोषण करण्यास सक्षम होत आहेत. गूगल, एआय, मेटा यांच्यासह जवळपास शंभरएक स्टार्ट्अप्स दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी कार्यरत आहेत.




एआयच्या मदतीने दिव्यांगांचे जीवन सुकर होत असल्याचे सांगत मुख्य सचिव अग्रवाल यांनी विविध उदाहरणांवरून दिव्यांगांचा प्रेरणादायी प्रवास कथन केला.

सचिव तुकाराम मुंढे म्हणाले, महाराष्ट्रातील दिव्यांगांची संख्या, त्यांचे अपंगत्वाचे प्रकार व गरजा यांची अचूक माहिती संकलित करून त्यावर आधारित धोरणे राबवली जात आहेत. दिव्यांग व्यक्तींना समाज व अर्थव्यवस्थेसाठी योगदान देणारे सक्षम घटक बनवणे, हेच शासनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि मशीन लर्निंगच्या साहाय्याने दिव्यांग सक्षमीकरणाला नवी दिशा मिळू शकते. शासनाच्या वेबसाइट्स व पोर्टल्स दिव्यांगांसाठी सुलभ करण्यावर भर देण्यात येत आहे. नाजिकच्या काळात एक सर्वसमावेशक सुलभ डिजिटल पोर्टल विकसित करण्यात येणार आहे. या पोर्टलवर एकदाच नोंदणी केल्यानंतर पात्र असलेल्या सर्व योजना, त्यासाठी लागणारी कागदपत्रे आदिची माहिती दिव्यांग व्यक्तीस उपलब्ध होतील, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी समावेशकतेसाठी एआयची क्षमता आणि समावेशक एआय उभारण्यात शासनाची भूमिका या विषयावर समूह चर्चा झाली. पहिल्या सत्रामध्ये झालेल्या चर्चेत किंटलचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी आशय सहस्त्रबुद्धे, बॅरियर ब्रेकच्या संस्थापक व व्यवस्थापकीय संचालक शिल्पी कपूर, सेंटर फॉर डिसॅबिलिटी स्टडीजच्या सहाय्यक प्राध्यापक डॉ. मधुरा नागचौधरी, झेवियर्स रिसोर्स सेंटर फॉर द व्हिज्युअली चॅलेंज्डचे व्यवस्थापकीय सल्लागार केतन कोठारी, स्कूल ऑफ कॉम्पुटिंगच्या असोसिएट डीन डॉ. प्रेमा नेडुंगडी आणि डॉ पुनीतकुमार गुप्ता यांनी ऑनलाईन सहभाग घेतला. द्वितीय सत्रामध्ये दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे, संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमच्या प्रादेशिक संलग्नता प्रमुख आफरीन सिद्दीकी, लीडस्पायर कन्सल्टिंगचे मुख्य उत्पादन अधिकारी मनोज नायर, नवाना टेकचे सहसंस्थापक राऊल नानावटी, झेवियर्स रिसोर्स सेंटर फॉर द व्हिज्युअली चॅलेंज्डचे कार्यकारी संचालक डॉ. सॅम तारापोरवाला आदी सहभागी झाले होते.

दोन्ही सत्रांचे सूत्रसंचालन प्रायमस पार्टनर्सच्या सहसंस्थापक आरती हरभजांका आणि देवरूप धार यांनी केले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# अंगणात बागडत होता २ वर्षांचा मयूर; अचानक मृत्यूनं गाठलं, आईचा अंगावर काटा आणणारा आक्रोश

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी :** आईच्या डोळ्यांसमोर घरापुढच्या अंगणात खेळणारा दोन वर्षांचा मयूर. काही क्षणांपूर्वीच त्याचे खिदळणे आणि बागडणे सुरू होते. मात्र, एका बेजबाबदार चाकाने या निरागस बालकाचे आयुष्य आणि एका कुटुंबाचे सुख क्षणात चिरडून टाकले. खराडी परिसरात पिकअप व्हॅनच्या चाकाखाली चिरडून मयूर अमर माळवे या दोन वर्षांच्या चिमुरड्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून, आईच्या आक्रोशाने उपस्थितांच्या काळजाचे पाणी झाले. पूनम माळवे यांचा दोन वर्षांचा मुलगा मयूर गुरुवारी सायंकाळी घरासमोरील मोकळ्या जागेत खेळत होता. तिथेच जवळच गोठा असल्याने दूध वाहतूक करणारे एक पिकअप वाहन तिथे आले. खेळण्याच्या नादात असलेला मयूर ड्रायव्हरच्या लक्षात आला नाही आणि निष्काळजीपणे चालवलेल्या वाहनाचे चाक थेट त्या चिमुरड्याच्या अंगावरून गेले. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या मयूरला पाहून आईने हंबरडा फोडला. त्याला तातडीने रुग्णालयात नेण्यात आले, पण नियतीला काही वेगळेच मान्य होते. उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

खराडीत चिमुरड्यांच्या मृत्यूचे सत्र

काही दिवसांपूर्वीच खराडीत एका ५ वर्षांच्या मुलाचा सोसायटीच्या आवारात गाडीच्या धडकेने मृत्यू झाला होता. ती जखम ताजी असतानाच आता २ वर्षांच्या मयूरचा बळी गेल्याने पालकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. ''आमच्या मुलांनी खेळायचं कुठे आणि कोणाच्या भरवशावर?'' असा आर्त सवाल आता विचारला जात आहे. या प्रकरणातही पोलिसांनी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मात्र, पोलिसांच्या कारवाईने आरोपीला शिक्षा होईलही, पण माळवे कुटुंबाने आपला 'लाडाचा मयूर' कायमचा गमावला आहे.

# ठाकरे बंधूंशी नडला त्याला... मनसे कार्यकर्त्यांकडून तरुणाला दिला चोप, काढली धिंड!

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईतील नालासोपारा परिसरात सोशल मीडियावर करण्यात आलेल्या आक्षेपार्ह पोस्टच्या कारणावरून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांनी एका तरुणाला चोप देण्याची घटना समोर आली आहे. या घटनेत संबंधित तरुणाला अर्धनग्न अवस्थेत एक ते दीड किलोमीटरपर्यंत फिरवण्यात आल्याचा आरोप करण्यात येत असून, यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणातील तरुणाचे नाव सूरज महेंद्र शिर्के असे असून, त्याने सोशल मीडियावर महाराष्ट्र नवनिर्माण सेना, ठाकरे गटाची शिवसेना, उद्धव ठाकरे, राज ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांच्याबाबत आक्षेपार्ह आणि अपमानास्पद मजकूर पोस्ट केल्याचा आरोप आहे. या पोस्टमुळे राजकीय कार्यकर्त्यांमध्ये संतापाची लाट उसळली.

या कारणावरून मनसेचे पदाधिकारी किरण नकाशे तसेच काही कार्यकर्त्यांनी सूरज शिर्केला पकडून त्याला चोप दिल्याची आणि अर्धनग्न अवस्थेत एक ते दीड किलोमीटरपर्यंत धिंड काढण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेचे काही व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले असून, त्यामध्ये मारहाणीचे दृश्य स्पष्टपणे दिसत आहे.


# पंतप्रधान मोदींचा एआय कंपन्यांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसोबत संवाद

नवी दिल्ली : एआयच्या नैतिक वापराबाबत कोणतीही तडजोड केली जाऊ नये, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते गुरुवारी दिल्लीतील त्यांच्या निवास्थानी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात काम करणाऱ्या प्रमुख मुख्य कार्यकारी अधिकारी आणि तज्ज्ञांशी संवाद साधत होते. फेब्रुवारीमध्ये होणाऱ्या इंडियाएआय इम्पॅक्ट समिटच्या पार्श्वभूमीवर, पंतप्रधान मोदी यांनी त्यांच्याशी संवाद साधला. या सत्राचा उद्देश धोरणात्मक सहकार्य वाढवणे, एआय नवोपक्रम प्रदर्शित करणे आणि भारताच्या एआय मिशनच्या उद्दिष्टांना गती देणे होता.

एआयचा नैतिक वापर

या वेळी बोलताना पंतप्रधानांनी डेटा सुरक्षा आणि तंत्रज्ञानाच्या लोकशाहीकरणाचं महत्त्व अधोरेखित केलं. ते म्हणाले की, एआयच्या नैतिक वापराशी कोणतीही तडजोड केली जाऊ नये. एक पारदर्शक, निष्पक्ष आणि सुरक्षित परिसंस्था आपण तयार करायला हवी, असं त्यांनी म्हटलं. भारताच्या एआय परिसंस्थेमध्ये देशाचे चारित्र्य आणि मूल्ये प्रतिबिंबित झाली पाहिजेत, असंही ते म्हणाले.

संवादादरम्यान, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी एआय तंत्रज्ञानामध्ये आत्मनिर्भर होण्याच्या ध्येयाला पाठिंबा दर्शवला. भारताला जागतिक स्तरावर एआयमध्ये आघाडीवर आणण्यासाठी सरकार जे प्रयत्न आणि संसाधनं वापरत आहे, त्याचीही त्यांनी प्रशंसा केली. पंतप्रधानांनी सर्व क्षेत्रांमध्ये नवीन तंत्रज्ञान स्वीकारण्याची आणि त्याचा उपयोग राष्ट्रीय विकासासाठी करण्याची गरज असल्याचं अधोरेखित केलं. त्यांनी प्रमुख क्षेत्रांमध्ये स्वदेशी तंत्रज्ञानाचा वापर करण्याचंही आवाहन केलं. आगामी एआय इम्पॅक्ट समिटबद्दल



बोलताना, त्यांनी सांगितलं की सर्व व्यक्ती आणि कंपन्यांनी या परिषदेचा उपयोग नवीन संधी शोधण्यासाठी आणि विकासाच्या मार्गावर मोठी झेप घेण्यासाठी केला पाहिजे. त्यांनी असंही म्हटलं की, युनिफाइड पेमेंट्स इंटरफेसद्वारे भारतानं आपली तांत्रिक क्षमता सिद्ध केली आहे आणि याची पुनरावृत्ती एआय क्षेत्रातही केली जाऊ शकते.

पंतप्रधानांनी अधोरेखित केलं की, भारताकडं प्रमाण, विविधता आणि लोकशाही यांचा एक अद्वितीय संगम आहे, ज्यामुळं जगाचा भारताच्या डिजिटल पायाभूत सुविधांवर विश्वास आहे. 'सर्वांसाठी एआय' या त्यांच्या दृष्टिकोनानुसार, त्यांनी सांगितलं की, आपण आपल्या तंत्रज्ञानानं प्रभाव निर्माण केला पाहिजे आणि जगाला प्रेरणा दिली पाहिजे. त्यांनी सीईओ आणि तज्ज्ञांना भारताला जागतिक एआयचं आग्रनी केंद्र बनवण्याचं आवाहनही केलं.

या उच्च-स्तरीय परिषदेत विप्रो, टीसीएस, एचसीएल टेक, झोहो कॉर्पोरेशन, एलटीआय माइंडट्री, जिओ प्लॅटफॉर्म्स लिमिटेड, अदानीकनेक्स, नेक्स्ट्रा डेटा आणि नेटवेब टेक्नॉलॉजीज यांसारख्या एआय क्षेत्रात काम करणाऱ्या कंपन्यांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी, तसंच आयआयआयटी हैदराबाद, आयआयटी मद्रास आणि आयआयटी बॉम्बे येथील तज्ज्ञांनी सहभाग घेतला. केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव आणि केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान राज्यमंत्री जितीन प्रसाद यांनीही या संवादात भाग घेतला.

# पान टपरी ते विधानसभा उपाध्यक्ष प्रवास दादांमुळेच झाला, अजित पवारांसोबत कायम सोबत असणाऱ्या अण्णा बनसोडेंना अश्रू अनावर

**दैनिक आपला विदर्भ**

**पिंपरी चिंचवड/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या प्रत्येक कठीण काळात त्यांच्या सोबत राहिलेले विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडेंना अश्रू अनावर झाले. पान टपरी चालवणाऱ्या माझ्या सारख्या सामान्य माणसाला अजित दादांनी विधानसभा उपाध्यक्ष केलं. हे सांगताना बनसोडेंना गहिवरून आलं. आता अजित दादांच्या पश्चात सुनेत्रा वहिनींना उपमुख्यमंत्री करावं, राजकीय वारसदार कोण? हे पवार कुटुंबीय ठरवतील, असं बनसोडे म्हणालेत. तर पक्षाचा राष्ट्रीय अध्यक्ष पवार कुटुंबातील असावा, त्याच्या नेतृत्वात मला यापुढं काम करण्याची इच्छा आहे. महाराष्ट्राच्या हितासाठी दोन्ही राष्ट्रवादींनी एकत्र येण्याची निर्णय पवार कुटुंबीयांनी घ्यावा, अशी ही इच्छा बनसोडेंनी व्यक्त केली. अजित पवार आपल्या सोबत नाहीत हे मानायला आमचं मन तयार नाही. गेल्या तीन दिवसापासून संपूर्ण महाराष्ट्र हळहळ करत आहे, आज राजकारणामध्ये स्पष्ट बोलणं एखादं काम होणार असेल तर होणार म्हणून सांगणारा आणि नसेल होणार तर नाही असे स्पष्टपणे सांगणारा, आणि सदैव कामासाठी धडपड करणाऱ्या हा महाराष्ट्रातील दांडगा नेता हरपल्याचा मला मनापासून दु:ख होत आहे. अजित दादांच्या बाबतीत सांगायचं झालं तर, खुप आठवणी आहेत, मी गेली २७ वर्ष अजित दादांसोबत काम करत आहे, आज माझ्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्याला इतकं मोठं पद दिलं, मी ते आयुष्यात विसरू शकत नाही, संपूर्ण महाराष्ट्राला माहिती आहे आज मी पानटपरी चालवणारा माणूस मला महाराष्ट्राचं उपाध्यक्षपद कॅबिनेट मंत्री पदाचा दर्जा असलेल्या पद त्यांनी मला दिलं, हे सगळं मी कदापि विसरू शकणार नाही, असंही बनसोडे बोलताना म्हणाले.

माझं वैयक्तिक मत आहे, सुनेत्रा वहिनींना उपमुख्यमंत्री पद देण्यात यावं, आणि राजकीय वारस ठरवण्याचा अधिकार हा पवार कुटुंबीयांना आहे. त्यांच्यामध्ये जो निर्णय होईल तो निर्णय माझ्यासारख्या सर्व कार्यकर्त्यांना मान्य असेल, ज्या पद्धतीने दादांनी महाराष्ट्रात काम केलं त्याच पद्धतीने वहिनी देखील काम करतील असा माझा विश्वास आहे, त्यामुळे माझ्यासारख्या सर्व कार्यकर्त्यांची भावना आहे की सुनेत्रा वहिनींना उपमुख्यमंत्री पद देण्यात याव, दोन्ही राष्ट्रवादी एकत्रित येण्याबद्दलचा निर्णय पवार कुटुंबीय घेतील. जी घटना घडली ती फारच दुर्दैवी आहे. या घटनेला फक्त दोन दिवस झाले, पवार कुटुंबीय पुढे जो निर्णय घेतील तो आम्हा सर्वांना मान्य असेल. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र यावे असे मी मागेही बोललो होतो, राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांच्या हितासाठी आणि महाराष्ट्राच्या हितासाठी दोन्ही राष्ट्रवादींनी एकत्र यावी अशी माझी इच्छा आहे. पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदाचा जो निर्णय आहे तो पक्षाच्या बैठकीमध्ये एकमताने मंजूर होईल आणि त्याबाबत लवकरच निर्णय घेतला जाईल असं मला वाटतं, आमची मनापासून अशी इच्छा आहे की पवार कुटुंबातीलच कोणीतरी राष्ट्रीय अध्यक्ष झाला पाहिजे अशी माझी इच्छा आहे, असंही बनसोडे यावेळी म्हणालेत.

# अर्थसंकल्पाआधी जेवणातलं 'तेल' पळवणारी बातमी; दरवाढीचे आकडे अनब कारणं समोर

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** तेलाच्या वाढत्या दरांनी सामान्य नागरिकांचे घरगुती बजेट पुन्हा एकदा अडचणीत आले आहे. आधीच जीवनावश्यक वस्तू महाग असताना आता स्वयंपाकघरातील खाद्यतेलही महागले आहे. गेल्या काही महिन्यांपासून तेलाच्या किमती स्थिर होत्या, मात्र आता अचानक दरवाढ जाणवू लागली आहे. पिकांचे नुकसान, आयातीवरील खर्च, जागतिक बाजारातील बदल आणि डॉलरच्या वाढत्या दरांचा थेट परिणाम खाद्यतेलांच्या किमतींवर झाला आहे. विशेष म्हणजे कोणताही सण-उत्सव नसतानाही तेलाच्या दरात वाढ झाल्याने ग्राहकांची चिंता वाढली आहे.

मागील काही काळापासून खाद्यतेलाचे दर फारसे बदलले नव्हते. बाजारात स्थिरता होती, त्यामुळे ग्राहकांना थोडा दिलासा मिळाला होता. मात्र, आता ही स्थिरता संपत चालली आहे. हळूहळू सर्व प्रकारच्या खाद्यतेलांच्या किमती वाढू लागल्या आहेत. व्यापाऱ्यांच्या मते, सध्याची परिस्थिती पाहता येत्या काळातही दर वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

पिकांचे नुकसान आणि कमी आयात

यंदा पावसाचा लहरीपणा शेतकऱ्यांसाठी अडचणीचा ठरला. वेळेवर पाऊस न पडणे आणि काही भागात अचानक अतिवृष्टी यामुळे भुईमूग आणि सोयाबीन पिकांचे नुकसान झाले. परिणामी बाजारात



कच्च्या मालाची आवक कमी झाली. विशेषत: शेंगदाण्याची आवक घटल्याने शेंगदाणा तेलाचे दर मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. व्यापाऱ्यांच्या मते, आवक वाढली नाही तर दर आणखी चढू शकतात.

साधारणपणे सणासुदीच्या काळात खाद्यतेलाचे दर वाढतात, मात्र यंदा सण नसतानाही दरवाढ झाली आहे. सोयाबीन उत्पादनावर अतिवृष्टीचा परिणाम झाल्याने सोयाबीन तेलाचे दर सध्या १३६ ते १४५ रुपये किलो दरम्यान आहेत. सूर्यफूल तेल १४३ ते १५० रुपये किलो दराने विकले जात आहे. सर्वाधिक वाढ शेंगदाणा तेलात झाली असून त्याचे दर १७० ते २१० रुपये किलोपर्यंत पोहोचले आहेत.

दरवाढीची कारणे आणि पुढील अंदाज

जागतिक बाजारात कच्च्या खाद्यतेलांच्या किमती वाढत आहेत. त्याचा परिणाम भारतातील बाजारावरही होत आहे. याशिवाय केंद्र सरकारचे २० टक्के आयात शुल्क, आंतरराष्ट्रीय व्यापारातील घडामोडी आणि डॉलरच्या वाढत्या दरामुळे आयात खर्च वाढला आहे. ही परिस्थिती कायम राहिल्यास येत्या काळात खाद्यतेलाच्या दरात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे ग्राहकांनी पुढील काळासाठी घरगुती बजेट अधिक काळजीपूर्वक आखण्याची गरज आहे.


## शब्दकोडे क्र. 72

आडवे शब्द

१. सज्जनांच्या नेहमीच विरूद्ध ४. चाणक्यनीती १०. लगत, शेजारी-शेजारी ११. समूह, संच १२. शेतावरील कर १३. इमारतीच्या पायात भरण्याचा राडारोडा १५. चुलता १६. घोड्याला आवर घालणारी वादी १७. उष्ण, कढत १९. नेमाने वारी करणारा २०. धनुष्य, नावाडी २१. साहित्यातील नऊ भावना २४. सरळ लांब वासा २५. यज्ञ २६. फार उष्ण व थंड नसलेले २८. अनाथांना आश्रय देणारी संस्था २९. निरर्थक बडबड ३१. छंद, आवाज ३२. 'अपना हाथ ----!' ३३. सध्याचे युग ३४. मोठी बहीण ३५. वर्ष, सन ३६. उजाड ३८. कान व डोळे यामधील भाग ४०. नुकतेच निधन झालेले प्रसिद्ध नाटककार- --- सरकार ४२. कौसल्यापुत्र ४३. जनावरांचा समूह ४४. हिंमत, धैर्य ४६. एक उबदार व सन्मानाचे वस्त्र ४७. दुप्पट (इंग्रजी) ४९. मध्यस्थ ५१. हिंदीत कीव, करूणा ५३. शर्विलक ५४. नोकर ५६. परग्रहावर जाणारे वाहन ५९. मेहरबानी ६०. बरोबर आलेली मंडळी ६३. जमीनजुमला ६६. श्रीमंत ६७. फोडामधील द्रव ६९. अवाढव्य, प्रचंड ७१. धैर्य ७२. मोठा समुद्र ७३. सूत काढण्याचे साधन ७४. वरपांगी, दिखाऊ

उभे शब्द

१. केशरचनेचा एक प्रकार, दुहेरी विण २. टक, दृष्टी ३. सनसनाटी ४. दुसऱ्याला कर्जबाजारी करणारा धंदा ५. मळलेला ६. टप्प्याटप्प्याने केलेला प्रवास ७. अस्थिर, डळमळीत ८. अर्पिलेली वस्तू ९. आळशांनी लक्षात घ्यायचा पंडित नेहरूंचा संदेश १२. क्षुधावर्धक गरम पेय १४. विटीदांडूच्या खेळातील खड्डा २०. हिंदीत सावली २१. रोख २२. नवरदेव २३. पोरका २४. सक्तमजुरीची शिक्षा २७. बंदी २८. उपासमारीची स्थिती ३०. जम ३३. चिवचिवाट ३४. संगीतातील ठेका ३५. वर्षानुवर्षे ३७. सारखा ३८. कपडालत्ता ३९. गार, थंड ४१. संगीतातील एक राग ४४. अगम्य ४५. नूतन ४८. फणसाचा एक प्रकार ५०. कीव, करूणा ५२. रत्न ५५. गव्हाचे जाडसर पीठ ५७. लग्नातील नवरा मुलगा ५८. देशी दारू ६१. सैन्यातील एक हुद्दा ६२. सामान ६४. बातमीदार ६५. मुलायम ६८. षट, पाचनंतरचा आकडा ६९. नंतर ७०. पराभव, माळ ७१. प्रामाणिक



### शब्दकोडे क्र. 71 चे उत्तर

आडवे उत्तर

१.मोगल ३.सोमवती ६.मग ८.सदा ११.ताजमहाल १३.मजलदरमजल १६.लीन १८.यमुना २०.बरका २१.नाक २२.गरम २५.मतदार २६.बाट २७.करवट २८.कलमदान २९.ताई ३०.मना ३१.स्वीय ३४.वरवर ३७.करतल ४१.दामोदर ४४.तमा ४५.जळवात ४६.जर ४७.शूर ४८.वचनावचनी ५०.पाणी ५१.सराफ ५२.नार ५३.काळ ५४.शर ५६.पडदा ५७.खरवस ५८.समक्ष ६०.रविवासर ६३.कर्तन ६४.उदास ६६.सरण ६७.नद ६९.मदार ७०.वजीर ७१.वाणी ७२.रट्टा ७३.शरद ७४.भोकर ७५.पारोसा ७६.आरमार ७७.सापळा ८०.दुवा ८१.लक्ष ८२.मस्त ८३.पापणी

उभे उत्तर

१.मोगली २.लता ३.सोम ४.महा ५.वलय ६.मज ७.गलबत ८.सरकार ९.दाम १०.हलकट १२.जळमट १३.मना १४.दरदाम १५.जनाबाई १७.नगर १९.मुक्काम २३.रवरव २४.हकनाक २५.मनस्वी २७.करवत २९.ताठर ३२.यदा ३३.सटरफटर ३५.रमावर ३६.रचनाकार ३८.रजनीश ३९.तळ ४०.लवाद ४२.मोजणीदार ४३.दर ४७.शूरा ४९.वळवळ ५०.पाड ५१.सकवार ५२.नामकरण ५५.रसदार ५६.पक्ष ५७.खनन ५९.मस ६१.विसरभोळा ६२.सणवार ६४.उदाहरण ६५.अवदसा ६८.दरसाल ७३.शरम ७५.पावा ७८.पसा ७९.राणी

# जिल्ह्यातील किन्होळा, गणेशपुर आणि जानेफळ प्राथमिक आरोग्य केंद्राला 'राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकन' पुरस्कार

## केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी उत्तम सेवा देणाऱ्या चमुचे केले अभिनंदन !

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** सार्वजनिक आरोग्य सेवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी केंद्र सरकारने सुरू केलेल्या राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकनाची एक यादी नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. या यादीमध्ये राज्यातील ५ प्राथमिक आरोग्य केंद्राचा समावेश आहे. त्यातील ३ प्राथमिक आरोग्य केंद्र हे बुलढाणा जिल्ह्यातील आहे. तर २ प्राथमिक आरोग्य केंद्र धाराशिव(उस्मानाबाद) जिल्ह्यातील आहेत. राष्ट्रीय गुणवत्ता मानांकन प्राप्त करणाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्रातील उत्तम आरोग्य सेवा देणाऱ्या सर्वच कर्मचाऱ्यांचे केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी अभिनंदन केले आहे.

आरोग्यसेवाची गुणवत्ता सुधारण्याच्या दृष्टिकोनातून केंद्र सरकारच्यावतीने राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकन पुरस्कार देण्यात येतात. प्राथमिक आरोग्य सेवा केंद्रात दिले जाणारे तातडीचे उपचार, रुग्ण रेफरचे प्रमाण, प्रसूती, रुग्णांसाठी असलेली आरोग्य सेवा, परिसर स्वच्छता, उद्यान, अत्याधुनिक यंत्रांचा वापर वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती यासह इतर बाबींना केंद्रबिंदु ठेवून पुरस्कारासाठी तपासणी करण्यात येते. ७ जानेवारी ते १८ जानेवारी २०२६ दरम्यान






केंद्रीय परीक्षकांनी मुद्देनिहाय तपासणी करुन या संदर्भाचा अहवाल केंद्रीय समितीस सादर केला होता.

राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानकांचा एक अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. या यादीमध्ये राज्यातील ५ प्राथमिक आरोग्य केंद्राचा समावेश आहे त्यातील ३ प्राथमिक आरोग्य केंद्र हे बुलढाणा जिल्ह्यातील आहे तर दोन धाराशिव( उस्मानाबाद) जिल्ह्यातील आहेत. राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकनामध्ये बुलढाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यामधील प्राथमिक आरोग्य केंद्र किन्होळा, खामगाव तालुक्यामधील प्राथमिक आरोग्य केंद्र गणेशपुर व मेहकर तालुक्यामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र जानेफळ, यांचा समावेश आहे. तर धाराशिव जिल्ह्यातील दहिपाल, अनाळा या प्राथमिक आरोग्य केंद्राचा समावेश आहे. राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासक मानांकन मध्ये पुरस्कार प्राप्त करणाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टर्स व कर्मचाऱ्यांचे केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी अभिनंदन केले आहे.

**ना. प्रतापराव जाधव यांना आरोग्य अधिकाऱ्यांनी केले होते आश्वस्त**

केंद्रीय आयुष आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी बुलढाणा येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनांमध्ये बैठक घेतली होती.या बैठकीदरम्यान राष्ट्रीय आरोग्य सेवेच्या मानांकनामध्ये जिल्ह्याच्या आरोग्य सेवेचा समावेश व्हावा अशी अपेक्षा केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केली होती. त्यासंदर्भातील सूचना संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिल्या होत्या. यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अमोल गीते,नोडल अधिकारी तथा जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. मिलिंद जाधव, जिल्हा सार्वजनिक आरोग्य परिचारिका शितल साखळीकर, कार्यक्रम सहाय्यक अमर राठोड जिल्हा हिवताप अधिकारी शिवराज चव्हाण यांनी जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांना मानांकन प्राप्त करुन देण्यासाठी त्यांना आश्वस्त केले होते. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या यादीमध्ये पाच पैकी तीन प्राथमिक आरोग्य केंद्र हे बुलढाणा जिल्ह्यातील आहे हे विशेष राष्ट्रीय मानांकनासाठी तालुका आरोग्य अधिकारी चिखली डॉ.ऋषिकेश कणखर, वैद्यकीय अधिकारी डॉ.अनुराधा गारोडे व प्रा.आ.केंद्र किन्होळा चमू, तालुका आरोग्य अधिकारी खामगाव डॉ.अभिलाष खंडारे व वैद्यकीय अधिकारी डॉ.बी.एस.तेलंग व गणेशपुर प्रा.आ.केंद्र चमू, तालुका आरोग्य अधिकारी मेहकर डॉ.विजय बलकार वैद्यकीय अधिकारी डॉ. सूरज ठाकरे व जानेफळ प्रा.आ. केंद्र चमू यांनी विशेष परिश्रम घेतले. या राष्ट्रीय मानांकनानंतर संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्रांना दरवर्षी रुपये तीन लाख हे तीन वर्षाकरिता बक्षीस स्वरूपात मिळणार आहे. सदर बक्षीसांमधून प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये रुग्णांकरिता सुविधा तसेच आरोग्य कर्मचाऱ्यांना बक्षीस स्वरूपात देण्यात येणार आहेत.

## वृत्तविशेष...

### कुसुम मोहिमे अंतर्गत जिल्हा कारागृहात ३१४ बंदीवानांची कुष्ठरोग तपासणी

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** राज्य शासनाच्या कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र(कुसुम) कुष्ठरोग शोध मोहीम २०२५-२६ अंतर्गत आज बुलढाणा जिल्हा कारागृहात विशेष आरोग्य तपासणी व जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या मोहिमेत कारागृहातील एकूण ३१४ बंदीवानांची प्रत्यक्ष शारीरिक तपासणी करण्यात आली.

ही मोहीम ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत संपूर्ण जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. बुलढाणा कारागृहात झालेल्या या तपासणी दरम्यान आरोग्य सेवा (कुष्ठरोग) विभागाच्या चमूने बंदीवानांना कुष्ठरोगाची लक्षणे, उपचार आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत सविस्तर आरोग्य शिक्षण दिले. यावेळी आरोग्य सेवा (कुष्ठरोग) सहाय्यक संचालक डॉ. हरी एस. पवार, जिल्हा कारागृहाचे कारागृह अधीक्षक मेधा बाहेकर उपस्थित होते.

भारत सरकारने २०२७ पर्यंत कुष्ठरोगाचा प्रसार पूर्णपणे थांबवण्याचे ध्येय ठेवले आहे. याच उद्दिष्टाच्या पूर्तीसाठी बुलढाणा जिल्ह्यातील वंचित आणि जोखमीच्या क्षेत्रांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. जिल्ह्यातील १८ हजार ८५१ व्यक्तींची तपासणी करण्यात येणार असून यासाठी १७० आशा स्वयंसेविका आणि पुरुष स्वयंसेवकांची टीम कार्यरत आहे. कारागृहाप्रमाणेच जिल्ह्यातील इतर संवेदनशील वस्तींमध्येही ही मोहीम राबवली जाणार आहे. कुष्ठरोगाचे वेळीच निदान झाल्यास तो पूर्णपणे बरा होऊ शकतो. जिल्ह्यातील नागरिकांनी या मोहिमेत सहभागी होऊन आरोग्य पथकाला सहकार्य करावे, असे आवाहन आरोग्य विभागातर्फे करण्यात आले आहे.

### जिल्हा क्रीडा संकुलात राज्यस्तरीय शालेय शुटींगबॉल स्पर्धांचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच विदर्भ रिजन शुटींगबॉल असोसिएशन यांच्या तांत्रिक सहकार्याने दि. २ ते ३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत जिल्हा क्रीडा संकुल, बुलढाणा येथे राज्यस्तरीय शालेय शुटींगबॉल क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धांमध्ये १७ वर्षांखालील मुले व मुली सहभागी होणार असून राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातून प्रत्येकी १० मुले व १० मुली सहभागी होतील. तसेच प्रत्येक विभागातून पुरुष व महिला संघ व्यवस्थापक, तज्ज्ञ पंचाधिकारी, स्वयंसेवक आदींची उपस्थिती राहणार आहे. स्पर्धांचा उद्घाटन समारंभ दि. फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता जिल्हा क्रीडा संकुल, जांभरून रोड, बुलढाणा येथे आयोजित करण्यात आला आहे. यावेळी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे मान्यवर अधिकारी, जिल्हा क्रीडा परिषदेचे पदाधिकारी, शिवछत्रपती पुरस्कारार्थी, अमरावती विभागाचे क्रीडा उपसंचालक, विदर्भ रिजन शुटींगबॉल संघटनेचे पदाधिकारी, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी तसेच क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी मुलींच्या संघांसाठी नवीन इमारतीत तर मुलांच्या संघांसाठी जुन्या इमारतीत निवास व्यवस्था करण्यात आली आहे. भोजन व्यवस्था देखील जिल्हा क्रीडा संकुल परिसरातच करण्यात येणार आहे. संकुल परिसरात शुटींगबॉलचे दोन अद्ययावत मैदाने तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. स्पर्धा आयोजनासाठी विविध समित्या जसे की आयोजन समिती, तक्रार निवारण समिती, उद्घाटन समिती, तांत्रिक समिती, मैदान व्यवस्था, भोजन, निवास, वैद्यकीय, प्रसिद्धी व स्वच्छता समिती सक्रियपणे कार्यरत आहेत. निवास व्यवस्था व संकुल परिसराची स्वच्छता पूर्ण झाली असून निमंत्रण पत्रिका, प्रमाणपत्रे, भोजन पासेस व इतर दस्तऐवजांचे काम अंतिम टप्प्यात आहे.

दरम्यान, दि. २ ते ३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत स्पर्धा असल्याने सैन्य व पोलीस भरती सरावासाठी जिल्हा क्रीडा संकुलातील मैदाने तात्पुरती बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. या स्पर्धांचा आनंद घेण्यासाठी जिल्ह्यातील क्रीडाप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे तसेच स्थानिक शाळांतील विद्यार्थ्यांनीही स्पर्धा पाहण्यासाठी नियोजन करावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर यांनी केले आहे.

### दीर्घ विश्रांतीनंतर 'ईथा'च्या सेटवर दमदार कमबॅक, साकारतेय विठाबाई नारायणगावकर!

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूड अभिनेत्री श्रद्धा कपूर पाच आठवड्यांच्या विश्रांतीनंतर पुन्हा ईथाच्या सेटवर परतली आहे. काही काळापासून ती मोठ्या पडद्यापासून दूर होती, मात्र आता 'ईथा' या आगामी चित्रपटाच्या सेटवर परतल्यानंतर ती चर्चेत आलीय. लक्ष्मण उतेकर यांचा महत्त्वाचा चित्रपट विठाबाई नारायणगावकर यांच्या भूमिकेत ती दिसणार आहे. यासाठी प्रचंड मेहनत ती घेत आहे.

'ईथा' हा चित्रपट विठाबाई नारायणगावर यांच्या व्यक्तिरेखेवर आधारित असल्याचं सांगितलं जात आहे. विठाबाई नारायणगावकर ही भूमिका श्रद्धाच्या करिअरमधील एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

### ठाण्यात शिवसेना शिंदे गटाच्या शर्मिला पिंपळोलकर महापौर, तर भाजपचे कृष्णा पाटील उपमहापौर; शिंदे-फडणवीसांचा मोठा निर्णय

**ठाणे/प्रतिनिधी :** ठाणे महानगरपालिकेतील सत्तास्थापनेबाबतची राजकीय गणिते अंतिम टप्प्यात आली असून, महापौर पदावर शिवसेना शिंदे गटाचा दावा निश्चित झाल्याचे चित्र आहे. शिवसेनेकडून शर्मिला पिंपळोलकर यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले आहे.

आज महापौर आणि उपमहापौर पदासाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा अंतिम दिवस असल्याने, ठाण्याच्या राजकारणात सकाळपासूनच मोठी उत्सुकता पाहायला मिळत आहे. ठाणे महापालिकेच्या महापौर केबिनमध्ये शिवसेनेच्या सर्व महिला नगरसेवकांची बैठक पार पडली. यावेळी विमल भोईर, शर्मिला पिंपळोलकर आणि डॉ. दर्शन जानकर हे महापौर पदाचे प्रबळ दावेदार उपस्थित होते. या बैठकीत शिवसेनेचा महापौर पदाचा चेहरा निश्चित करण्यात आला आहे. शर्मिला पिंपळोलकर यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याची माहिती समोर येत आहे. दुसरीकडे, ठाण्यात भाजपची आक्रमक विरोधाची भूमिका आता मावळल्याचे दिसून येत आहे. भाजपने सत्तेत सहभागी होण्याचा निर्णय घेतला असून, उपमहापौर पदावरही भाजपचा प्रतिनिधी बसवण्याची तयारी केली आहे. भाजपकडून कृष्णा पाटील यांना उपमहापौर पदासाठी उमेदवारी अर्ज भरण्याचे आदेश देण्यात आल्याची माहिती आहे. दरम्यान, शिंदेसेनेने ठाण्यात भाजपला दोन वर्षांसाठी महापौरपद देण्यास स्पष्ट नकार दिला आहे.

### सोमवारी (२ फेब्रुवारी) जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी शासन निर्णयानुसार जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येतो. त्याअनुषंगाने फेब्रुवारी महिन्याचा महिला लोकशाही दिन सोमवार, दि. २ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात येणार आहे. तरी पिडीत महिलांनी महिला लोकशाही दिनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महिला व बालविकास अधिकारी अमोल डिघुळे यांनी केले आहे.

महिला लोकशाही दिनात समस्याग्रस्त व पीडित महिलांनी उपजिल्हाधिकारी यांना उद्देशून विहित नमुन्यातील अर्ज द्विप्रतीत सादर करावेत. तक्रार/निवेदन वैयक्तिक स्वरूपाचे असणे आवश्यक आहे. लोकशाही दिनामध्ये महिलांनी स्वतः उपस्थित राहणे अनिवार्य आहे. विहित नमुन्यात नसलेले अर्ज, न्यायप्रविष्ट, सेवा व आस्थापना विषयक प्रकरणे तसेच वैयक्तिक स्वरूपाचे नसलेले निवेदन स्वीकारले जाणार नाही. समस्याग्रस्त व पीडित महिलांचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने शासनाने हे व्यासपीठ उपलब्ध करून दिले असून, पीडित महिलांनी महिला लोकशाही दिनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## अन्न व औषध प्रशासन येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा; माजी सैनिकांचा गौरव, संविधान मूल्यांचा जागर

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त अन्न व औषध प्रशासन कार्यालय येथे ध्वजारोहण व विविध कार्यक्रमांचे आयोजन करून प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी जिल्ह्यातील माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सहाय्यक आयुक्त(औषधे) तथा कार्यक्रम अध्यक्ष गजानन प्रल्हाद घिरके यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर तंबाखू मुक्ती शपथ तसेच भारतीय संविधान शपथ घेण्यात आली. संविधानातील मूल्ये अधिक दृढ व्हावीत या उद्देशाने संविधान विषयक गीताचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी शासकीय कर्तव्य निष्ठापूर्वक व सचोटीने पार पाडणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशस्तीपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

सुभेदार मेजर एकनाथ उबरहंडे, सुभेदार गजानन वैद्य, हवालदार पांडुरंग जाधव, सुभेदार संजय चिंचखेडे, सुभेदार रमेश गवई, सुभेदार अशोक शेळके, सुभेदार गजानन उबरहंडे, नायक बजरंग निकम, नायक त्र्यंबक नेमाने, हवालदार समाधान जाधव व हवालदार संदीप जाधव यांच्यासह अनेक माजी सैनिकांचा गौरव करण्यात आला. याप्रसंगी सुभेदार अशोक शेळके व हवालदार संदीप जाधव यांनी सैन्य दलातील अनुभव कथन करून उपस्थितांना प्रेरणा दिली.

अन्न व औषध प्रशासन, बुलढाणा यांच्या वतीने उपस्थित सर्व माजी सैनिकांचा जाहीर सत्कार करून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. त्यानंतर केमिस्ट व ड्रगिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष गजाननजी शिंदे तसेच किराणा दुकानदार असोसिएशनचे अध्यक्ष अमरचंदजी कोठारी यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. अध्यक्षीय भाषणात गजानन प्रल्हाद घिरके यांनी राष्ट्रप्रेम, सैनिकांचा देशासाठी असलेला त्याग, संविधानाचे महत्त्व तसेच जिल्ह्यातील केमिस्ट व ड्रगिस्ट संघटनेचे उल्लेखनीय कार्य यावर सखोल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीकांत मोरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सुरक्षा अधिकारी अक्षय भोपाळे, प्रमुख लिपिक जयंत झोपे, रोखपाल मुकुंद खुर्दे, डेटा एंट्री ऑपरेटर विजय जाधव, आशिष देशमुख, अजाबराव घेवंदे व कारभारी मस्के यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास राजू पाटील (उपाध्यक्ष, केमिस्ट व ड्रगिस्ट असोसिएशन), अभिजीत निंबाळकर, गणेश बंगाळे, निलेश गावंडे, रवी वाढते, धर्मेश कमानी, मुंदडा, सोनोने यांच्यासह अनेक औषधी विक्रेते व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अजित दादा यांना खळेगाव वासियांकडून श्रद्धांजली, महाराष्ट्राच्या राजकारणातील एक खंबीर नेतृत्व हरपले

दैनिक आपला विदर्भ

**लोणार/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री स्व.अजित दादा पवार यांच्यावर २८ जानेवारी रोजी काळाने घाला घातला त्यात त्यांचा व त्यांच्यासोबत असलेले वैमानिक त्यांचे बॉडीगार्ड यांचा मृत्यू झाला त्याला पाहता महाराष्ट्राचे कधीही न भरून निघणारे नुकसान झाले.यावर लोणार तालुक्यातील खळेगाव येथे ३० जानेवारी रोजी गावकऱ्यांतर्फे श्रद्धांजली अर्पण करण्याचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता.

माणस सांभाळण्याची हातोटी,सहकार,राजकारण,अर्थकारण यामध्ये तरबेज विधिमंडळातील एक मर्द नेतृत्व म्हणून त्यांची प्रतिमा होती.





कटाक्षाने तंतोतंत वेळ पाळणारे आणि वेळेला अत्यंत महत्व देणारे अजित दादा पवार यांचा दबदबा होता. त्यांनी सर्वच पक्षाच्या आमदारांना निधी दिला आहे.निधी वाटप करतांना त्यांनी कधी राजकारण केले नाही.आणि दादांनी कधी जातीपातीचे राजकारण केले नाही.असे उद्गार श्रद्धांजली अर्पण करतांना वक्त्यांनी काढले.दादांच्या लाडक्या बहिणी सुद्धा ह्या श्रद्धांजली च्या कार्यक्रमासाठी प्रामुख्याने हजर होत्या.दादांच्या जिवन चरित्रावर भाषण सुरु असतांना काही लाडक्या बहिणींना अश्रू अनावर झाले. आणि लाडक्या बहिणींचा अश्रूचा बांध फुटला.शेवटी दादांच्या आणि दादा सोबत मृत्यूमुखी पडलेल्या सर्व सहकार्याच्या आत्म्यास शांती लाभण्यासाठी प्रतिमेचे पूजन करून आणि सामूहिक पसायदान म्हणून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

या कार्यक्रमाप्रसंगी सरपंच उपसरपंच,पोलीस पाटील,तंटामुक्ती अध्यक्ष तसेच ग्रामपंचायत चे सर्व पदाधिकारी,गावातील सर्व जाती धर्माचे नागरिक तसेच सर्वपक्षीय कार्यकर्ते हजर होते.